# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 12 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १२ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.**

****

देशभरात अपघात ग्रस्तांसाठी रोखरहित उपचार योजना लवकरच सुरु केली जाईल, अशी माहिती केंद्रीय परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात बोलत होते. ही योजना सहा राज्यांमध्ये सुरु असून, लवकरच उत्तर प्रदेश आणि नंतर उर्वरित देशात सुरू केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. या योजनेमुळे रस्ते अपघातातील पीडितांना रूग्णालयात दीड लाख रुपयांपर्यंतचे रोखरहित उपचार मिळू शकतील. महामार्गावरील वाढत्या अपघातांच्या संख्येवर चिंता व्यक्त करून गडकरी यांनी, खासदारांना, प्रत्येक जिल्ह्यात अपघात प्रतिबंधक समित्या स्थापन करण्याची विनंती केली.

दरम्यान, लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात महाराष्ट्रातल्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर विविध सदस्यांनी प्रश्न विचारले.

धाराशिवचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर यांनी महामार्ग भूसंपादनात शेतकर्यांना किरकोळ मोबदला मिळत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. २०१३च्या कायद्याप्रमाणे भूसंपादन करावं, अशी मागणी त्यांनी केली. यावर गडकरी यांनी, भूसंपादन हे राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे होत असल्याचं सांगितलं. धाराशिव शहर सुरत – चेन्नई महामार्गाला जोडण्यासंदर्भातही निंबाळकर यांनी विचारणा केली असता, यासंदर्भात विचार करण्याचं आश्वासन गडकरी यांनी दिलं. उमरगा – सोलापूर राष्ट्रीय महामार्ग अद्याप पूर्ण झाला नसून, त्यामुळे या रस्त्यावर अपघातांचं प्रमाण वाढत असल्याकडेही खासदार निंबाळकर यांनी लक्ष वेधलं. तसंच टेंभुर्णी – लातूर मार्गाचं चौपदरीकरणासंदर्भात विचारणा केली. एका महिन्यात यासंदर्भात टेंडर काढण्यात येणार असल्याची माहिती गडकरी यांनी दिली.

परभणीचे खासदार संजय जाधव यांनी परभणीला राष्ट्रीय किंवा राज्यमार्गाला जोडण्यासाठी विनंती केली. यावर बोलताना गडकरी यांनी, महाराष्ट्रात ७८ प्रकल्प सुरु असून, लवकरात लवकर ते पूर्ण करण्याचं आश्वासन दिलं.
शिर्डीचे खासदार  भाऊसाहेब वाघचौरे यांनी अहिल्यानगर – शिर्डी मार्गाची दुरावस्था झाली असल्याचं सांगितलं. हा अडीच हजार कोटी रुपयांचा प्रकल्प असून, १५ दिवसांचं टेंडर काढून कामाला सुरुवात करणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं. रस्त्यांच्या कामात दिरंगाई करणार्या कंत्राटदारांवर कारवाई करण्यासाठी कायदा करण्याची मागणी वाघचौरे यांनी केली. पूर्वी कंत्राटदारांसाठी शिथिल केलेले नियम आता पुन्हा कडक केले असल्याची माहिती गडकरी यांनी दिली.
नंदुरबारचे खासदार गोवाल पाडवी यांनी पिंपळनेर ते सटाणा रस्त्याबाबत, तर मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी देहू – पंढरपूर पालखी मार्गात असलेल्या संरक्षण विभागाच्या जागेतल्या जागेबाबत विचारणा केली. हे दोन्ही मार्ग लवकरात लवकर पूर्ण होतील, असं गडकरी यांनी सांगितलं.

****

विविध मुद्द्यांवरून विरोधी पक्षांच्या नेत्यांनी केलेल्या गदारोळामुळे राज्यसभेचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब झालं. आज सकाळी सभागृहाचं कामकाज सुरु झाल्यावर विरोधी पक्षांचे स्थगन प्रस्ताव सभापती जगदीप धनखड यांनी फेटाळून लावले. यावर विरोधी पक्षांनी आक्षेप घेत घोषणाबाजी सुरू केली. सभापतींच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह किंवा टीका केली जाऊ शकत नाही, असं सभागृह नेते जे पी नड्डा यांनी नमूद केलं. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पत्रकार परिषद घेऊन सभापतींना प्रश्न विचारल्याचा त्यांनी निषेध केला. काँग्रेस पक्ष घटनात्मक अध्यक्षपदाचा अवमान करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप करत त्यांनी, विरोधी सदस्यांच्या वर्तनावर निषेधाचा प्रस्ताव मांडला. यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांवर आरोप – प्रत्यारोप करत गदारोळ केला. त्यामुळे सदनाचं कामकाज दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब झालं.

****

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. मोदी यांचा अमूल्य वेळ, मार्गदर्शन, आशीर्वाद आणि महाराष्ट्राच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल फडणवीस यांनी त्यांचे आभार मानले. गेल्या दहा वर्षात पंतप्रधानांच्या पाठिंब्याने महाराष्ट्र जवळपास प्रत्येक क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आहे आणि आता त्यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली

विकासाचा हा प्रवास पुढील स्तरावर नेण्याचं ध्येय असल्याचं, त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. मंत्रिमंडळ विस्ताराविषयी ठरलं असून, त्यात कोणताही तिढा नाही, असं फडणवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

****

परिवहन महामंडळाच्या लातूर विभागाला दिवाळी दरम्यान एसटीच्या जादा फेर्यांमधून २ कोटी ४२ हजार रुपयांचं उत्पन्न प्राप्त झालं आहे. गेल्या १५ आक्टोबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत पुणे, सोलापूर, परभणी, नांदेड, छत्रपती संभाजीनगर, परांडा, माजलगाव या मार्गावर जादा फेऱ्या चालवण्यात आल्या होत्या.

****

फिडे जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत आज दुपारी भारताचा ग्रँड मास्टर डी गुकेश आणि चीनचा डिंग लिरेन यांच्यात चौदावा आणि अंतिम सामना होणार आहे. हा सामना अनिर्णित राहील्यास उद्या स्पीडचेस प्रकारातून विजेता निवडा जाईल. दोन्ही खेळाडुंना सध्या प्रत्येकी साडे सहा गुण मिळाले आहेत.

****

खेलो इंडिया २०२५ हिवाळी स्पर्धा लडाख आणि जम्मू-काश्मीरमध्ये दोन स्वतंत्र टप्प्यांमध्ये होणार आहेत. लडाखमध्ये २३ ते २७ जानेवारी या काळात आईस हॉकी आणि आईस स्किइंगसारख्या स्पर्धा होणार आहेत, तर जम्मू-काश्मीरमध्ये २२ ते २५ फेब्रुवारी या काळात अल्पाइन स्किइंग, स्नोबोर्डिंग अशा स्पर्धा होणार आहेत. केंद्रीय क्रीडामंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय यांनी ही माहिती दिली.

****